Publication: Punyanagari
Date: 18/6/2019
Page: 9
Column: 4-5

पुण्य नगरी

मंगळवार
१८ जून २०१९

# अदानी इलेक्ट्रिसिटी पावसाळ्यासाठी सज्ज

**मुंबई** : पश्चिम व पूर्व उपनगरात वीजपुरवठा करणाऱ्या अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड या वितरक कंपनीने पावसाळ्यासाठी सर्व विभाग सज्ज असल्याचे जाहीर केले आहे. तसेच या काळातील सुरक्षितता उपायांची घोषणा केली आहे.

पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या आपत्कालीन स्थितीचे निराकरण करण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने सेंट्रल डिझास्टर कंट्रोल रूम कार्यान्वित केले आहे. अंतर्गत विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिका या दोन्ही संस्था वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी करत पाणी साचल्याच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी काम करणार आहेत. एईएमएलने कोणत्याही नैसर्गिक आपत्तीदरम्यान वीजपुरवठा वितरणाचे नुकसान कमी करण्यासाठी एकीकृत आपत्ती व्यवस्थापन योजनेचा अवलंब केला आहे. पायाभूत सुविधांसह प्रतिसाद, रिकव्हरी व सुधारणा योजना सादर केली आहे. वीजपुरवठा, वीजनिर्मिती, पारेषण नेटवर्क संदर्भातील आपत्तीसाठी तयारीचा समावेश असेल. जून ते सप्टेंबरदरम्यान ३००९९१११ या क्रमांकावर थेट सेंट्रल डिझास्टर कंट्रोल रूमकडे नोंद करू शकतात. तसेच १८००५३२९९९८ या क्रमांकावर मिस कॉल द्यावा, असेही आवाहन वीज ग्राहकांना करण्यात आले आहे. सुरक्षितता उपायांबाबत एईएमएलचा प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अदानीने उपकरणांची मान्सूनपूर्व तपासणी व प्रतिबंधात्मक देखरेख केली आहे. तसेच सेंट्रल डिझास्टर व्यवस्थापन टीमला अतिरिक्त मदतीसाठी एक स्पेशल टीम तयार केली आहे. तसेच अतिरिक्त हेल्पलाईन्स सुरू केल्या आहे. तसेच ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी वीजपुरवठ्याच्या सेफ्टी स्विच ऑफची सुविधा अदानीकडून देण्यात येणार आहे.

## अशी घ्या काळजी :

***ओल्या हाताने किंवा हँड ग्लोव्हज, सेफ्टी शूज किंवा इन्सुलेटेड प्लॅटफॉर्मचा वापर न करता कोणत्याही इलेक्ट्रिकल इन्स्टॉलेशन्सला स्पर्श करू नका. शंका असल्यास मदतीसाठी अदानी इलेक्ट्रिसिटीशी संपर्क साधावा. तसेच मंजूर केलेल्या भारापेक्षा अधिक विजेचा वापर करू नका, असेही अदानीकडून आवाहन करण्यात आले आहे.***